**प्रेस नोट    दिनांक २३/०४/२०१९**

**फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**''फरासखाना पोलीसांनी अट्टल गुन्हेगार जयेश लोखंडे कडुन गावठी पिस्टल जप्त''**

सध्या लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने गुन्हेगार चकींग व पेट्रोलिंग सुरु आहे. फरासखाना पोलीस स्टेशन हद्दीतील मंगळवार पेठ परिसरात तपासपथकाचे पोलीस उप निरीक्षक श्री. सुर्यवंशी व स्टाफ असे पेट्रोलिंग करीत असताना बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, शिवाजी आखाड्याजवळ मंगळवार पेठ पुणे येथील कोंबडी पुलावर एक इसम त्याचे कंबरेला पिस्तुल लावुन फिरत असुन, त्याने बिस्कीट कलरचा हाफ शर्ट व जिन्स पॅन्ट घातलेली आहे. अशी माहिती मिळाली. सदर माहितीच्या आधारे पोलीस उप निरीक्षक श्री. सुर्यवंशी व स्आफ यांनी सापळा रचला असता वरील वर्णनाचा इसम हा कोंबडी पुलावर शिवाजी जवळ येत असल्याचे दिसला. त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव जयेश लोखंडे असे सांगितले. त्यास दोन पंचासमक्ष ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याने अंगात घातलेल्या बिस्कीट कलरचा हाफ शर्टच्या आतमध्ये कंबरेला लावुन ठेवलेला गावठी पिस्टल व दोन राऊंड मिळुन आले. त्याची अंदाजे किंमत ३० हजार रुपये आहे. त्यास ताब्यात घेवुन त्याचे विरुध्द फरासखाना पोलीस स्टेशन  पुणे गुन्हा रजि. नं. १५४/२०१९ आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन, त्यास दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

वरील कामगिरी ही श्री. सुहास बावचे सर, पोलीस उप आयुक्त सा़े. परिमंडळ १, पुणे शहर, मा. श्री. प्रदीप आफळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, फरासखाना विभाग, पुणे शहर श्री. किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री.यशपाल सुर्यवंशी, पोलीस उप निरीक्षक, तसेच पोहवा खुटवड, पोलीस नाईक चव्हाण, पोलीस नाईक चौगुले, पोलीस शिपाई वाल्मिकी यांनी सदरची कारवाई केलेली आहे.

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे.